
CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ३ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ९८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# ना परवाना, ना सुरक्षा, चार महिलांना मिळाली फुकटची शिक्षा

✔ सुराज्य/सोलापूर

**ज्या फटका कारखान्यात नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी आगीने तांडव माजवले, त्या कारखान्याला ना कुठला परवाना होता; ना सुरक्षिततेचे कुठले नियम पाळले. आग कशी लागली हे जरी गुलदस्त्यात असले तरी त्या आगीत चार महिलांना जीव गमवावा लागला. याप्रकरणी पांगरी पोलिसांनी गुन्हा दाखल करताच दोघेही कारखाना मालक फरार झाले आहेत.**

## ▪ गुन्हा दाखल होताच फटाका कारखाना मालक फरार



- शिराळे येथील शेतजमीन गट नं. ४६९ मध्ये युसूफ हाजू मणियार रा. पांगरी. ता. बार्शी व भागीदार नाना पाटेकर यांनी उभारले विनापरवाना फटाक्याचे गोदाम
- गोदामामध्ये केला स्फोटकांचा बेकायदेशीर साठा
- फटाके तयार करताना मजुरांची केली नाही सुरक्षा
- मजुरांच्या जीवितास धोका होऊ नये म्हणून सुरक्षेबाबत कोणतीही उपाययोजना केली नव्हती.
- ज्या कृत्यामुळे मृत्यू येण्याची शक्यता आहे, हे माहीत असूनसुध्दा फटाक्याच्या कारखान्याची व तेथे काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षेबाबत जाणीवपूर्वक हलगर्जीपणा केला
- हलगर्जीपणा केल्यामुळे मजुरांचा मृत्यू घडून येणे संभवनीय आहे याची जाणीव असताना सुध्दा त्यांनी केले असे कृत्य

बार्शी तालुक्यातील शिराळे येथे फटाका कारखान्याला लागलेल्या आगीत जळून चार महिलांचा मृत्यू आणि दोन महिला जखमी झाल्याप्रकरणी युसूफ हाजू मणियार व त्याचा भागीदार नाना पाटेकर या दोघांविरुध्द विनापरवाना फटाका कारखाना सुरू करून गोदामात फटाक्यांचा साठा केल्याप्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यातील सहाय्यक फौजदार सतीश कोठावळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा भा.दं.वि. कलम ३०४, ३३७, ३३८, २८५, २८६, ३४ आणि भारतीय विस्फोटक अधिनियम १८८४ चे कलम ५, ९ ब प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. कारखान्याला आग लागल्याचे समजताच हे दोघेही मालक फरार झाले आहेत.

### आणखी एक फटाका कारखाना

पोलिसांनी शिराळे येथील गट नं ४६९ मध्ये फटाका उत्पादन, साठा व विक्री परवान्याबाबत चौकशी केली असता त्याठिकाणी कोणताही परवाना नसल्याचे समजले. तसेच पोलिसांनी तेथील शेजारील शेतकरी अण्णा चौधरी यांच्याकडे चौकशी केली असता गट नं. ४६९ मधील दीड एकर शेतजमीन त्यांनी ४ वर्षापूर्वी युसूफ मणियार (रा. पांगरी) यांना विकलेली आहे. या जमिनीवर गेल्या ३ वर्षापासून युसुफ मणियार व नाना पाटेकर असे दोघे मिळून फटाक्याचे गोडावून चालू केलेले आहे. तसेच त्यांचा शिराळे येथील गट नं ३९५ मध्ये सुध्दा एक फटाक्याचा कारखाना असल्याची माहिती पोलिसांनी चौकशीत पुढे आली आहे.

**चार महिला ठार, दोघी जखमी :** कारखान्याला लागलेल्या आगीमध्ये गंगाबाई मारुती सांगळे (रा. उक्कडगांव), सुमन ज्ञानोबा जाधवर (रा.वालवड), मिना बाबूराव मगर (रा. पांगरी), मोनिका संतोष भालेराव (रा. वालवड) या भाजून गंभीर जखमी होऊन ठार झाल्या. कौशल्या सुखदेव बगाडे व अन्य एक महिला फटाक्याच्या आगीत भाजून जखमी होण्यास युसूफ हाजू मणियार व नाना पाटेकर हे कारणीभूत झाले आहेत, अशा आशयाची फिर्याद दिली आहे.

# आ.शहाजीबापूंनी कमी केले तब्बल ९ किलो वजन

✔ **सोलापूर** : काय झाडी काय डोंगार काय हॉटेल या खुमासदार संवादामुळे संपूर्ण राज्यात फेमस झालेले शिंदे गटाचे फायरब्रँड नेते तथा सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील आता वेगळ्याच कारणाने चर्चेत आहेत.



त्यांनी बंगळुरू येथील हॅपिनेस कार्यक्रमात पंचकर्म उपचार घेत तब्बल ९ किलो वजन कमी केले आहे. २४ डिसेंबरपासून शहाजीबापू त्यांचे मित्र महेश पाटील यांच्यासोबत बंगळुरू येथील श्री श्री रविशंकर यांच्या आश्रमात पंचकर्म आणि सुदर्शन क्रिया करण्यासाठी गेले होते. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनासाठी गेलेले शहाजीबापू दोन दिवसानंतर गायब झाले होते. बंगळुरू येथील आश्रमात शहाजीबापू पाटील पहाटे पाच वाजता उठून रोज दोन तास योगासने, त्यानंतर उकडलेल्या पालेभाज्या, कडधान्ये याचा नाश्ता तर दुपारी बौद्धिक गोष्टी ऐकणे आणि ध्यानधारणा, वाफेवर उकडलेल्या पालेभाज्या आणि चपातीचे पौष्टिक आणि शुद्ध शाकाहारी भोजन करायचे. दुपारी सुदर्शन प्रक्रिया आणि व्यायाम तर संध्याकाळी मेडिटेशन. असा त्यांचा भरगच्च कार्यक्रम होता.

या कार्यक्रमामुळे २४ डिसेंबरपासून विरोधकांच्या टीकेवर शहाजीबापूंची कुठलीही प्रतिक्रिया समोर आलेली नव्हती.सांगोल्यात आलेल्या शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केल्यानंतरही शहाजीबापू पाटलांकडून कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया समोर आलेली नव्हती.

# खासगीकरणाच्या विरोधात ८६ हजार वीज कामगार

## ● ४ जानेवारीपासून जाणार ७२ तासाच्या संपावर

✔ सुराज्य/सोलापूर

अदानी इलेक्ट्रिक कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज निर्माण आयोगाकडेसमांतरपरवान्यासाठी नफा मिळविण्याच्या उद्देशाने अर्ज केलेला आहे. त्यामुळे खाजगीकरणाच्या विरोधात सर्व संघटनांनी एकत्र येऊन ८६ हजार वीज कामगार दि. ४ जानेवारीपासून ७२ तासाच्या संपावर जाणार असल्याची माहिती एम.एस.ई. बी. वर्कर्स फेडरेशनचे विलास कोले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ठाणे, भांडुप, मुलुंड, नवी मुंबई, पनवेल, तळोजा व उरण परिसरातील महावितरण कंपनीच्या अधिपत्याखालील क्षेत्रात अदानी इलेक्ट्रिकल कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे समांतर परवान्यासाठी अर्ज केलेला आहे. त्यास वीज ग्राहक लोकप्रतिनिधी व वीज कामगार संघटना सर्वत्र विरोध करीत असून त्याविरोधात कर्मचारी अधिकारी संघर्ष समितीने आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. महाराष्ट्रभर द्वार सभा घेवून राज्य सरकारच्या खाजगीकरणाच्या विरोधात निषेध केला आहे.

राज्य सरकारने वेळोवेळी कोटयावधी रूपये खर्च करून



लाखो ग्राहकांना वीज पुरवठा देण्यासाठी हजारो रोहित्र, लाखो पोल शेकडो हजारो उपकेंद्रे उभी केली. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला २४ तास अखंडित वीज पुरवठयाचा लाभ मिळत आहे. असे असूनही अलीकडे अदानी इलेक्ट्रिक कंपनीने राज्यातील महसुलीदृष्टया अतिशय महत्वाच्या असलेल्या भांडुप परिमंडळांतर्गत महाराष्ट्र राज्य वीज निर्माण आयोगाकडे समांतर परवान्यासाठी नफा मिळविण्याच्या उद्देशाने अर्ज केलेला आहे.

हा अशा प्रकारच्या देशातील पहिलाच प्रयोग महाराष्ट्रामध्ये होत आहे. जर असा परवाना देण्यात आला तर राज्याच्या वीज उदयोगावर त्याचे विपरीत परिणाम होतील.

# सोलापुरात निवासी डॉक्टरांचा संप; आरोग्य यंत्रणा कोलमडली

✔ सुराज्य/सोलापूर

निवासी डॉक्टरांच्या विविध मागण्यासंदर्भात मध्यवर्ती मार्ड संघटनेच्यावतीने करण्यात आलेल्या संपामध्ये सोलापुरातील दोनशेहुन अधिक डॉक्टरांनी सहभाग घेतला. त्यामुळे आरोग्य यंत्रणा कोलमडली.

अत्यावश्यक सेवा वगळता निवासी डॉक्टरांचा संप सुरू आहे. वरिष्ठ निवासी डॉक्टरांच्या १४३२ जागांची पदनिर्मिती करावी, महाराष्ट्रातील सर्व



शासकीय पालिका महाविद्यालयात अपुरे व मोडकळीस आलेल्या वस्तीगृहामुळे विद्यार्थ्यांची होणारी हेळसांड थांबवावी आदी विविध मागण्यासाठी राज्यभरात निवासी डॉक्टरांनी हा संप पुकारला आहे. त्याच अनुषंगाने सोलापुरात देखील निवासी डॉक्टरांचा संप सुरू झाला आहे. या संपाबाबत राज्यसरकारने निर्णय नाही घेतला तर उद्यापासून अत्यावश्यक सेवा पण बंद करण्याच्या इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी डॉ.विकास कटरे, डॉ दीपक काटे, डॉ ओंकार शेंडे, डॉ. सागर राऊत यांच्यासह मोठ्या संख्येने डॉक्टरांची उपस्थिती होती.

# बेघर वसाहत येथे विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

✔ सुराज्य/सोलापूर

मजरेवाडी परिसरातील बेघर वसाहतीत राहणाऱ्या एका ३२ वर्षीय विवाहित महिलेने आईच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. दीपांजली सुनील माने (वय ३२ रा.बेघर वसाहत,होटगी रोड) असे मयताचे नाव आहे. तिचे सासर देखिल आईच्या घराजवळ आहे. काल सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास तिचा मृतदेह माहेरच्या घरातील छताच्या लोखंडी हुकाला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

मयत दीपांजली हिच्या पश्चात पती आणि सासू सासरे असा परिवार आहे.तिचा पती मजुरी करतो.या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार कांबळे तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, यांचे नववर्ष संकल्प किती टिकतील ?

| कल्याण |
|---|
| -------- |

| मेन बाजार |
|---|
| -------- |


# सरपंचाला कास्टिंग वोटचा अधिकार देण्याला कोर्टात आव्हान

## ● राज्यातील उपसरपंचपदाच्या निवडी सापडणार वादाच्या भोवऱ्यात

✔ सुराज्य/मुंबई

**राज्यात ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा धुरळा उडून आता तो कुठे खाली बसत असून उपसरपंचपदाची निवड करण्याची लगबग सुरू असतानाच उपसरपंचाच्या निवडीसाठी सरपंचाला दोन वेळा दिलेला मताचा अधिकार बेकायदेशीर आहे, असा आक्षेप न्यायालयात घेतला गेल्याने या पदाची निवड वादात सापडण्याची चिन्हे दिसत आहेत.**

अगोदरच ओबीसी आरक्षणावरून महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका बऱ्याच महिन्यांपासून लटकलेल्या असताना ग्रामीण विकासाचा कणा असलेल्या ग्रामपंचायतींचा कारभारही ठप्प होणार की काय? अशी शंका



उपस्थित केली जात आहे. याबाबतचे वृत्त असे की- राज्यात शिंदे-फडणवीस यांचे सरकार आल्यानंतर सरपंचपदाची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानुसार राज्यात सुमारे सात हजारांपेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सरपंचांची निवड लोकांमधून झाली. आता उपसरपंच निवडला जाणार आहे. या पदाच्या निवडीत समसमान मते पडली तर निर्णायक मत (कास्टिंग वोट) देण्याचा अधिकार सरपंचाला देण्याचा आदेश ग्रामविकास खात्याकडून काढला गेला आहे.मूळ निवडीच्या मतदान प्रक्रियेत सरपंच भाग घेऊ शकतात.समसमान मते झाली तर पुन्हा निर्णायक मताचा अधिकार असा दुबार अधिकार दिला गेला आहे. हा आदेश रद्द करण्यातयावायासाठीमुंबईउच्चन्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. संबंधित अधिकारामुळे ग्रामपंचायत सदस्यांच्या संख्येत वाढ होत असल्याने ही बाब नियमबाह्य असल्याचा युक्तिवाद खंडपीठात करण्यात आला. या याचिकेवर मंगळवार दि. ३ जानेवारी रोजी न्यायमूर्ती मंगेश पाटील व न्यायमूर्ती संतोष चपळगावकर यांच्यासमोर सुनावणी होणार आहे. कवडगाव (ता. औरंगाबाद) ग्रामपंचायतचे



सदस्य ज्ञानदेव रोडे, कविता भोजने, लीला रोडे, मुक्तार शेख यांनी ड सिद्धेश्वर ठोंबरे यांच्यामार्फत ही याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेत राज्य शासन, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव, कक्ष अधिकारी, औरंगाबादचे जिल्हाधिकारी, व तहसीलदार यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. नोव्हेंबर २०२२ रोजी नव्या दुरुस्तीनुसार सरपंच जनतेतून थेट निवडला जातो. सरपंचाला उपसरपंचाच्या निवडीत समान मते पडली तर निर्णायक मताचा अधिकार देण्यात आला आहे. ग्रामविकास मंत्रालयाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी यासंबंधी ३० सप्टेंबर २०२२ ला पत्र काढले. खंडपीठात ॲड. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी युक्तिवाद केला. सरपंच हा पदसिद्ध सदस्य आहे, त्याला उपसरपंच निवडीत दोन वेळा मतदान करता येणार नाही.

सदस्य म्हणून सरपंचाने दोन वेळा मत दिले तर ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्य संख्येमध्ये दोनने वाढ होते. चार आणि तीन असे सात सदस्य संख्या असलेल्या ग्रामपंचायतमध्ये मत विभाजन झाले तर तीन मते पडलेल्या उमेदवाराला सरपंचाने दोन मते दिली तर संबंधित ग्रामपंचायतची सदस्य संख्या ही नऊ होते. त्यामुळे हा कायदा बेकायदेशीर असल्याचे त्यांनी याचिकेत स्पष्ट केले आहे.

CMYK